# शुभ संकल्पाची ज्योत

## ~ गुरुमाई चिद्विलासानंद

प्रकाशात राहणे
एका व्यक्तीच्या हृदयाची सर्वात आवडती इच्छा असते
अतः, ही सौभाग्याची गोष्ट आहे की प्रकाश हा प्रत्येक सणाचे
एक अभिन्न अंग असतो

जी गोष्ट दीपावलीला विशिष्ट बनवते
ती म्हणजे प्रकाश या सणाचे केंद्रण आहे—
प्रकाश सर्वोपरी,
जिवंत ज्योत

दीपावलीच्या रात्री वातावरण
हजारो, लाखो, करोडो ज्योतींनी चमचमत असते
प्रत्येक ज्योत अगणित आशीर्वादांचा वर्षाव करत असते

प्रत्येक दीप तुमच्या दृढ संकल्पाने प्रज्वलित करा
प्रत्येक दीप तुमच्या हार्दिक मनोकामनेने प्रज्वलित करा
प्रत्येक दीप या बोधासह प्रज्वलित करा
की तुमची ही पूजा
भगवंताच्या मुखकमलावर सुहास्य आणते आहे

शुभ दीपावली

***

जेवढा म्हणून घनदाट अंधार पसरलेला असतो
तेवढ्याच जोराने अज्ञान आपला प्रभाव पाडते
जेवढा भरपूर उजेड पसरलेला असतो

तेवढ्याच जोराने ज्ञान आपले प्रभुत्व दाखवते
अंधकार आणि प्रकाश शतकानुशतके आपापसात लढत आले आहेत
आणि शताब्दींच्याही पुढपर्यंत
यांचा प्रबळ संग्राम चालूच राहील
तसे पाहता या दोन्ही शक्ती आपापल्या क्षेत्रात
हे जाहीर करण्यास मागेपुढे पाहत नाहीत की तिथे त्यांचे राज्य आहे
पण विजय त्या मनुष्याचा होईल जो
अंधकार आणि प्रकाश यांचा स्वभाव समजून घेऊन
त्यानुसार या दोघांशी आपले खरे नाते जोडेल

लोकांचा स्वभावदेखील पृथक-पृथक असतो
एकाला अंधाराविषयी जिव्हाळा असतो तर
दुसऱ्याची मनोवृत्ती उजेडाकडे जाते
कोण चांगला आहे आणि कोण वाईट,
या वादविवादातच मनुष्याचे आयुष्य
अदृश्य होते
हा तर्कवितर्क ना आज सुरू झाला आहे ना दशकांपूर्वी
ही तणतण, ही वादावादी तर होतच राहिली आहे
कुठे वृक्षशाखांच्या खाली
कुठे घर-ओसऱ्यांमध्ये
कुठे गावागावांतील चावड्यांमध्ये
कुठे मांडवांच्या खाली
कुठे चौक-चौरस्त्यांवर
मुख्य बाब काय आहे?
हीच की सहस्त्रावधी जीवने या चर्चेची बळी ठरली आहेत
विडंबना ही आहे की प्रत्येकाची
स्वतःविषयी एकच धारणा आहे,
“मीच चांगला आहे,
मीच श्रेष्ठ आहे,
मीच योग्य आहे,

मीच प्रसंशनीय आहे"—
वगैरे, वगैरे
तमाला कवटाळून बसणाऱ्या आणि प्रकाशाला आलिंगन देणाऱ्या—
दोन्ही दलांमध्ये आहे बळ
दोन्ही पक्षांमध्ये आहे दम
दोन्हीकडे चुंबकीय प्रभाव आहे
आता भरवसा कोणावर ठेवावा?
प्रत्येक मानवाचे कर्तव्य काय आहे?

या द्वंद्वापासून मुक्तता मिळवण्यासाठी
आपण तेजस्वी आणि ज्ञानी ऋषिमुनींच्या
विद्वत्तेचा आधार घेतो
त्यांच्या प्रज्ञानावर विश्वास ठेवतो
त्यांच्यापाशी देण्यासाठी जे काही आहे त्यावर आपण श्रद्धा ठेवतो—
अशी खात्री बाळगतो की आपण त्यांचे ज्ञान आत्मसात करू शकतो
आपण दृढ विश्वास ठेवतो की ते फलद्रूप होईल
आपण त्यांच्या विवेकाचा अंगीकार करतो
श्रीगुरूंची उपासना करतो
श्रीगुरूंकडून शिकवणी प्राप्त करतो
श्रीगुरुदर्शित मार्गाचे अनुसरण करत
स्वतःला स्थैर्य देतो

स्मरणात ठेवा की सर्वांसाठी ‘सुंदरते’चा अनुभव
त्यांच्या आपापल्या कर्मांवर,
त्यांच्या आपापल्या परिस्थितींवर आणि
त्यांच्या आपापल्या जीवनशैलीवर अवलंबून आहे
म्हणूनच, या शुभ दीपावलीच्या प्रसंगी,
तुमचा संकल्प शुद्ध करण्यासाठी प्रयत्न करा
जितके लक्षपूर्वक तुम्ही प्रयत्न कराल
तितकाच लाभ प्राप्त कराल

हे पाहा ना,
दिवा जळतजळत तुम्हाला रम्य जीवन देतो
तिमिर घनदाट होतहोत तुम्हाला गिळंकृत करतो
तुम्ही जेव्हा मिट्ट अंधारात हरवून जाता
तेव्हाच हे तुमच्या लक्षात येते
खरे सांगायचे तर
गोचर आणि अगोचर सुखाची आभाच
आध्यात्मिक वृत्ती असलेल्या
व्यक्तीचा आधार आहे

होय, शुभ दीपावली तुम्हालासुद्धा!
एक सांगू का?
तुमचे जीवन प्रकाशशून्य आहे
का प्रकाशाने ओतप्रोत आहे
या तर्कवितर्कात न अडकता
बस, असा संकल्प करा की
दीपावलीच्या सणाची द्युतिमा
तुमच्या अंतरी अनंत काळ वास करो
तिचे तेज तमाम पापांचे निवारण करो
अंतरीची दीप्ती सर्वदा निरामय राहो
अंतर्ज्ञान सदैव प्रज्वलित राहो
आणि तुम्ही सदैव सतर्क राहून तुमच्या समजूतदारपणाचा उपयोग करावा
तुम्हाला जीवनात कोणत्याही संकटाचा सामना करावा लागला
तरीही याकडे लक्ष द्या की मनात दहशतीने घर करता कामा नये
तुमच्यात ही योग्यता आणि ही आंतरिक शक्ती आहे की तुम्ही या संकटांना
एका दीपमाळेत परिवर्तित होऊ द्याल

तुमची अंतर-ज्योत स्वप्रकाशित आहे
तिच्या दिव्यतेने तुम्हाला अंतर्मुखी करावे असे होऊ द्या

तुमच्या अंतर-ज्योतीची देखभाल करा
तुमच्या अंतर-ज्योतीचे पोषण करा
तुमच्या अंतर-ज्योतीशी संवाद साधा
तुमच्या अंतर-ज्योतीसाठी गा
तुमच्या अंतर-ज्योतीसंगे नृत्य करा

तुमच्या अंतर-ज्योतीची मृदुलता श्वासात भरून घ्या...
तुमच्या अंतर-ज्योतीची सुषमा श्वासात भरून घ्या...
तुमच्या अंतर-ज्योतीची पूर्णता श्वासात भरून घ्या...
तुमच्या अंतर-ज्योतीची पावनता श्वासात भरून घ्या...

तुमच्या अंतर-ज्योतीची सुरक्षितता अनुभवा
जी आश्रय देते, जी सांत्वना प्रदान करते

तुमच्या अंतर-ज्योतीचे संरक्षण करा
ती केवळ तुमची आहे, तुमच्यासाठी भगवंताची भेट

सहस्रावधी वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेनुसार
या वर्षी दीपावलीचा सण साजरा करताना,
*या* समयी जेव्हा विश्वामध्ये मंथन चाललेले आहे,
मनामध्ये खालील प्रार्थनेचे स्मरण ठेवून
तुम्ही मुद्दाम वेळ काढून यावर ध्यान कराल का?

## प्रार्थना

ॐ
विशुद्धासनोपविष्टः सुस्थिरसौम्यमानसः।
ध्यायामि हृदयेऽचलज्योतिः पूर्णसमर्पणभावः॥
प्रार्थनां मम स्वीकुरु हे भगवन्न् अखिलेश्वर।
नमस्कारं करोमि ते स्फुरणसंवित्सागर॥

ॐ

पवित्र आसनावर बसून
स्थिर आणि सौम्य मनाने
पूर्ण समर्पण भावासह
मी हृदयाच्या अचल ज्योतीवर ध्यानस्थ आहे.

हे भगवंता, अखिल सृष्टीच्या ईश्वरा!
माझ्या प्रार्थनेचा स्वीकार कर.
हे चितीच्या चमचमणाऱ्या महासागरा!
तुला माझा प्रणाम!

***

माझ्या अंतरी माझ्या श्रीगुरूंनी जागृत केलेली नीलज्योत
माझ्या अस्तित्वातून संपूर्ण अंधकाराचे हरण करो

माझ्या अंतरी ऊर्ध्वाकाशातून झुळझुळ वाहणारी
श्वेत ज्योत माझ्या अस्तित्वाला उन्नत करो

माझ्या अस्तित्वात प्रवेश करणारी
धरणी मातेची स्वर्णिम ज्योत
मला माझ्या समस्त सीमित समजूतींपासून मुक्त करो

प्रेमाची ज्योत माझे शुद्धीकरण करो
आणि हे विशुद्ध प्रेम माझ्या अंतरी तसेच बाहेर झगमगावे

शांतीची ज्योत माझ्या आत्म्यात
वसलेल्या सत्याप्रति माझ्या हृदयात खुलेपणा आणू दे

भक्तीची ज्योत माझ्या बंधनकारी अहंचा सर्वनाश करो
आणि भगवत्करुणेची मधुरता माझे मार्गदर्शन करो

माझ्या मनाला माझ्या विचारांमध्ये निहित असलेली उज्ज्वल किरणे शोधून काढता येवोत

माझ्या हृदयाला माझ्या भावभावनांमध्ये प्रकाशबीजे शोधता येवोत

मी माझ्या सभोवताली प्रसृत झालेल्या प्रभेच्या चांगुलपणाचे
माझ्या संपूर्ण अस्तित्वानिशी संरक्षण करावे—
माझ्या विचारांद्वारे
माझ्या भावनांद्वारे
माझ्या शब्दांद्वारे
माझ्या कर्मांद्वारे

मी दीपावलीच्या नृत्य करणाऱ्या
प्रत्येक ज्योतीच्या उपस्थितीचा सन्मान करावा

मी दीपावलीच्या प्रत्येक ज्योतीची महत्ता समजून घ्यावी

दीपावलीच्या प्रत्येक ज्योतीतून स्फुरणाऱ्या गाण्याला
मी माझ्या स्वराची स्पंदने अर्पित करावीत

मी प्रत्येक दिवशी आणि प्रत्येक रात्री दीपावलीचे
कल्याणकारी स्वरूप अनुभवावे

मी ज्या कोणाला भेटेन त्या भेटीदरम्यान
दीपावलीच्या हर्षोल्लासाची अनुभूती मी करावी

एकमेकांसमवेत वाटून खाल्ल्या जाणाऱ्या
स्वादिष्ट पक्वान्नांमध्ये
मी दीपावलीच्या रसाचा आस्वाद घ्यावा

गरजू लोकांची मदद
करण्यासाठी मी सदैव तत्पर राहावे

मी दीपावलीच्या ज्योतीला जी कृतज्ञता अर्पित करेन
ती त्या प्रत्येक मनुष्याचा आधार बनो ज्याला
त्याच्या स्वतःच्या अंतर-प्रकाशाचा शोध घेण्याची तळमळ आहे

माझी वाणी माझ्या शुभ संकल्पांची
शीतलता व्यक्त करो

माझी कर्मे माझ्या उदार हृदयाची कोमलता अभिव्यक्त करोत

दीपावलीची कांती मला सदैव असे सामर्थ्य प्रदान करत राहो की
ज्यायोगे मी माझे आत्मबल नित्यनवीन ठेवावे

माझे जीवन भगवंताच्या प्रकाशाचे सच्चे प्रमाण असो

सप्रेम,
गुरुमाई चिद्विलासानंद

© २०२५ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.